| | |
|---|---|
| MHKO170000392022 | **रे.क.नं. ६/२०२२**<br>मारुती सखाराम बुगले वगैरे<br><br>विरुध्द<br>बंडु सखाराम बुगले,वगैरे |

**निशाणी ४८ खाली आदेश पारीत.**

सदरचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १०(२) प्रमाणे ज्यादाचे प्रतिवादी म्हणून सामील करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, सदरचा दावा हा वाटप होवून मिळणेसाठी म्हणून दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार सखोबा नागू बुगले यांना वादी व प्रतिवादी क्रमांक १ ते ६ व्यतिरिक्त हौसाबाई हरी बाऊचकर व कमळाबाई विठु मतसागर या दोन मुली असून त्यांचाही कायदेशिर व सरळ हक्क सदर दाव्याचे कामी आहे परंतू नजरचुकीने त्यांना दाव्यात सामील करणेचे राहून गेले आहे. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुत दाव्याचे कामी मयत हौसाबाई व कमळाबाई हिचे सरळ वारस असून ते सखोबाचे देखील वारस असून त्यांना आवश्यक पक्षकार प्रतिवादी म्हणून सामील करुन घेणेत घ्यावे याकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास त्याच अर्जावर म्हणणे दाखल केलेले आहे. सदर म्हणण्यामध्ये त्यांनी वादींनी अर्जात नमुद केलेप्रमाणे सखोबाचे अन्य वारसांचा दावा मिळकतीशी काहीही हक्कसंबंध येत नव्हता व नाही त्यामुळे वादींनी दाखल केलेले वरील वारसांना पक्षकार म्हणून समाविष्ठ करता येणार नाही. सबब सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा असे सांगीतले आहे.

४. अर्ज, अर्जातील कथने व वादीचे म्हणणे यांचे अवलोकन केले. अर्जामध्ये वादी यांनी असे कथन केले आहे की, सदरचा दावा हा वाटप होवून मिळणेबाबत दाखल केलेला आहे. दाव्यात नमुद हौसाबाई हरी बाऊचकर व कमळाबाई विठु मतसागर यांचाही कायदेशिर व सरळ हक्क सदर दाव्याचे कामी असून त्यांचे देखील हितसंबंध आहेत. त्यामुळे सदर कामी त्यांना प्रतिवादी म्हणून सामील करणेस परवानगी मागीतली आहे. प्रतिवादी यांनी या अर्जास हरकत नोंदवुन अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

५. एकंदरीत पाहता सदरचा दावा हा वाटप होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तावीत पक्षकार हे वादी व प्रतिवादी यांचे नातेसंबंधातील आहेत. प्रस्तावीत पक्षकार हे त्यांना दावा मिळकतीमध्ये वारसा हक्काने अधिकार असल्याचे नमुद करीत आहेत. वाटपाच्या दाव्यामध्ये सर्व वारसांचे हक्क निश्चीत केले जातात. वाटपाच्या दाव्यामध्ये सर्व वारसदार नसतील तर दाव्याची संपुर्णपणे निर्गती होणार नाही. सबब दाव्याच्या संपुर्ण व अंतिम न्यायनिर्गतीसाठी सर्व वारस म्हणजेच प्रस्तावीत पक्षकारांसह वादी, प्रतिवादी अभिलेखावर असणे महत्वाचे आहे. वर नमुद केलेप्रमाणे दाव्याच्या संपुर्ण व न्यायनिर्गतीसाठी प्रस्तावित पक्षकार यांना प्रतिवादी म्हणून अभिलेखावर घेण्यामुळे प्रस्तुतचा दावा पुर्णपणे निर्गत होईल. त्यांना पक्षकार न केल्यास दावा अपुर्ण राहिल. वरील सर्व तथ्ये, परिस्थिती व चर्चिले विधानाप्रमाणे अर्ज मंजूर करणेत येत आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आ दे श

०१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

०२. प्रस्तुत दाव्यात अर्जात नमुद केलेप्रमाणे हौसाबाई हरी बाऊचकर मयत तर्फे वारस ८-अ(१) ते (२),८-ब ते ८-ड (१) ते (२), ९(अ)-१ते ४ , ९-ब, ९( क)-१ व १० प्रतिवादी म्हणून सामील करणेत यावेत.

०३. वादीने सदरची दुरुस्ती करुन दुरुस्ती दाव्याची प्रत चौदा दिवसांचे आत दाखल करावी.

Digitally signed by MANE VAISHNAVI ROHAN
Date: 2024.12.10 17:07:57 +0530

दिनांक १०.१२.२०२४.

श्रीमती व्ही. आर. माने,
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पन्हाळा